# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 20.12.2025** **वार-शनिवार**

---

**जयशंकर**

विकसित भारताचं परराष्ट्र धोरण हे महत्त्वाकांक्षी असलं पाहिजे. भविष्यात आपण क्षितीजापलीकडे जाणाऱ्या अशा व्यापक योजना आखण्याची गरज आहे. तसंच आपल्याला जास्तीत जास्त मित्रराष्ट्रांना यामध्ये स्थान देण्याची गरज आहे जेणेकरुन भारताची स्थिती अधिक मजबूत होईल असं प्रतिपादन केंद्रीय परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांनी आज पुण्यात सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय अभिमत विद्यापीठाच्या पदवीदान समारंभात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना केलं. विकसित भारत @2047' या उद्दिष्टासाठी विद्यार्थ्यांनी देशाच्या प्रगतीचं मुख्य सारथी होण्याचं आवाहन त्यांनी केलं.

**जयशंकर-पुणे पुस्तक महोत्सव**

रामायण आणि महाभारत ही केवळ धार्मिक पुस्तकं नसून ती जागतिक राजकारणाचे धडे देणारी उत्तम मार्गदर्शक आहेत, असं प्रतिपादन परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी पुणे पुस्तक महोत्सवातील व्याख्यानात केलं. भारताचं परराष्ट्र धोरण आता पाश्चात्य विचारांच्या पलीकडं जाऊन आपल्या सभ्यता आणि संस्कृतीवर असायला हवं. रामायणात श्रीरामांनी विविध शक्तींना एकत्र आणून कशा प्रकारे एक भक्कम युती तयार केली, हे आजही देशांना आपल्या मित्रराष्ट्रांसोबत संबंध प्रस्थापित करण्यासाठी प्रेरणादायी आहे. श्रीकृष्ण आणि हनुमान जगातील सर्वात मोठे आणि कुशल 'डिप्लोमॅट्स' आहेत. हनुमानानं श्रीलंकेत केलेली शिष्टाई आणि श्रीकृष्णानं महाभारताच्या युद्धात केलेली रणनीती ही आधुनिक कूटनीतीची सर्वोत्तम उदाहरणं आहेत असं त्यांनी स्पष्ट केलं.

**पुणे पुस्तक महोत्सव**

पुणे पुस्तक महोत्सवाला पुणेकरांचा उत्स्फूर्त आणि अभूतपूर्व प्रतिसाद मिळत असून, आतापर्यंत सुमारे सात लाखांपेक्षा अधिक नागरिकांनी भेट दिली आहे. उद्या या महोत्सवाची सांगता होणार आहे. रसिकांनी विविध विषयांवरील पुस्तकांची मोठ्या प्रमाणावर खरेदी केली.

या महोत्सवात, अटलजी : एक व्रतस्थ याज्ञिक या पुस्तकाचं प्रकाशन भाजपचे राष्ट्रीय महामंत्री विनोद तावडे यांच्या हस्ते करण्यात आलं.

**कला**

भारताला कलेचा हजारो वर्षांचा संपन्न वारसा समृद्ध करण्याची जबाबदारी भावी पिढ्यांवर असून केंद्र सरकार राष्ट्रीय कला महोत्सवाच्या माध्यमातून कलेचं जतन आणि संवर्धन करत आहे असं मत केंद्रीय शालेय शिक्षण संचालनालयाचे अंतिरिक्त सचिव आनंदराव पाटील यांनी आज पुण्यात व्यक्त केलं.
राष्ट्रीय शिक्षण, संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेच्या वतीनं आजपासून पुण्यात आयोजित राष्ट्रीय कला उत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. माध्यमिक वर्गातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी दरवर्षी देशातल्या विविध भागात या उत्सवाचं आयोजन करण्यात येतं. हा महोत्सव प्रथमच महाराष्ट्रात होत आहे. या महोत्सवात 37 राज्यातून विद्यार्थी आणि शिक्षक सहभागी झाले आहेत. एकंदर बारा कला प्रकारांच्या स्पर्धा होत आहेत.

**आरोग्य**

महाराष्ट्र राज्य हॉटेल व्यवस्थापन आणि खानपान तंत्रज्ञान यांच्या वतीनं 'आरोग्यजागर' या विषयावर एक दिवसाचा जनजागृती कार्यक्रम पुण्यात आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी आरोग्य शिबिर, अवयव दान जनजागृती व्याख्यान, तसंच

आपत्कालीन वैद्यकीय प्रथमोपचार म्हणजे CPR प्रशिक्षण सत्र यांचा समावेश होता. या कार्यक्रमात 300 हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

**प्रवेश**

पुण्यातील एकंदर 22 माजी नगरसेवकांनी आणि प्रमुख पदाधिकाऱ्यांनी आज मुंबईत खासदार मुरलीधर मोहोळ आणि भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. काँग्रेसचे माजी उपमहापौर आबा बागुल यांनी आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला.

**यादी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगानं प्रभागनिहाय अंतिम मतदान केंद्रांची यादी आज प्रकाशित करण्यात आली आहे. ही यादी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**संमेलन**

न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग प्रशालेच्या स्नेहसंमेलनाचं उद्घाटन आज ध्वजारोहणानं झालं. पुढील पाच दिवस चालणाऱ्या या संमेलनात वंदे मातरम् सार्ध शती निमित्तानं, या राष्ट्रगानाचा इतिहास सांगणारे संगीत आनंदमठ हे नाटक उद्या होणार असून भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास सांगणाऱ्या स्वातंत्र्य समर या विशेष नृत्य नाटिकेचं सादरीकरण येत्या मंगळवारी होणार आहे.

**स्वरांगण**

गेल्या 25 वर्षापासून पुण्यातील संगीत क्षेत्रात कार्यरत स्वरांगण दृष्टीहीन संस्थेचा 26 वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त संगीत क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्या दृष्टीहिन व्यक्तीस दिला जाणारा 'स्वरभूषण पुरस्कार' यंदा नाशिक इथले भगवान पवार यांना, तर जीवनगौरव पुरस्कार पुण्याचे भगवान धेंडे यांना प्रदान करण्यात आला. पूजा शांताराम जाधव यांना विशेष सन्मान देण्यात आला.

**रोटरी**

समाजाचं आणि राष्ट्राचं हित करतं ते साहित्य होय; वाङ्मय मात्र अविनाशी, कालातीत, स्थिर आणि निरंतर आहे, असं मत विद्यावाचस्पती डॉक्टर शंकर अभ्यंकर यांनी पुण्यात रोटरी साहित्य संमेलनात व्यक्त केलं. तर व्यक्त-अभिव्यक्त होण्यातील फरक समजण्यासाठी माध्यमांच्या शाळांची गरज असल्याचं असं मत संमेलनाचे अध्यक्ष प्राध्यापक प्रवीण दवणे यांनी एका मुलाखतीत व्यक्त केलं. समाजमाध्यमांसह सर्वच माध्यमं कशी हाताळावीत, त्यावर काय बघावं, कसं, किती बघावं, हे शिकवण्याची वेळ आली आहे, असंही ते म्हणाले.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**